असा. क्र. ११०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जुलै ८, २००८/आषाढ १७, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधी व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै २००८

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १४०४/प्र.क्र. १९६/दोन.— भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, विधि व न्याय विभागाच्या विधि शाखेतील सहायक (विधि), गट-ब या पदाचे सेवा (भरती) नियम, २००२ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहोत :—

१. या नियमांना, विधि व न्याय विभागाच्या विधि शाखेतील सहायक (विधि), गट-ब या पदाचे सेवा (भरती) (सुधारणा) नियम, २००८ असे म्हणावे.

२. विधि व न्याय विभागाच्या विधि शाखेतील सहायक (विधि), गट-ब या पदाचे सेवा (भरती) नियम, २००२ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ३ मध्ये,–

(क) पोट-नियम (एक) मध्ये, "३०" या आकड्याऐवजी "३३" हा आकडा दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-नियम (तीन) मधील, " (तीन) संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी ठरवून दिलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. " हा मजकूर वगळण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ५ नंतर, पुढील नियम जादा दाखल करण्यात येईल :–

**" ६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल असे संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करील. ".**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**प्र. द. कुळकर्णी,**
शासनाचे उप सचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd July 2008

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1404/C.R. 196/II.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Assistant (Legal) in the Legal Side of the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2002, as follows, namely :—

1. These rules may be called the Assistant (Legal) in the Legal Side of the Law and Judiciary Department (Recruitment) (Amendment) Rules, 2008.

2. In rule 3 of the Assistant (Legal) in the Legal Side of the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2002 (hereinafter referred to as " the Principal Rules ").—

(*a*) in sub-rule (1), for the figure "30", the figure "33" shall be substituted ;

(*b*) in sub-rule (3), the brackets, figure and words "(3) possess a Certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time. " shall be deleted.

3. After rule 5 of the Principal Rules, the following rule shall be added, namely :—

" 6. A person appointed to the post mentioned in rule 3, shall possess a certificate in Computer operation as prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra from time to time. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. D. KULKARNI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई